# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि महाविद्यालयीन/परिसंस्थातील विभागप्रमुख यांच्या निवडणुकीच्या मतमोजणीच्या स्थळाबाबत.**

**जाहीर प्रकटन**

या प्रकटनाद्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(द) अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील १० अध्यापक आणि कलम २८(२)(ध) अन्वये ०३ विद्यापीठ अध्यापक अधिसभेवर तसेच कलम ३२(३)(छ) अन्वये प्रत्येक विद्याशाखेचे ०२ अध्यापक विद्यापरिषदेवर व ४०(२)(ग) अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थांतील ०३ विभागप्रमुख प्रत्येक अभ्यासमंडळावर निवडून देण्यासाठीची निवडणूक रविवार, दि. ०८ जानेवारी, २०२३ रोजी होणार आहे.

सन २०१७ चा एकरुप परिनियम क्र. १ मधील १०(८) नुसार जर वैध नामनिर्देशनांची संख्या भरावयाच्या रिक्त पदांच्या संख्येपेक्षा अधिक नसेल तर निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याच्या दिनांकास नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांना निवडून आले असल्याचे घोषित करण्यात येईल अशी तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार उक्त नमूद विविध अधिकार मंडळांच्या मतदारसंघातून ज्या प्रवर्गातील अंतिम वैध नामनिर्देशनांची संख्या, भरावयाच्या रिक्त पदांच्या संख्येपेक्षा अधिक नसल्याने जे उमेदवार निवडून आलेले आहेत, अशा उमेदवारांची नावे मंगळवार, दि. १० जानेवारी, २०२३ रोजी **विद्यापीठाच्या पै. खाशाबा जाधव क्रीडा संकुल येथील इनडोअर हॉलमध्ये** घोषित करण्यात येणार आहेत.

तसेच विविध अधिकार मंडळांच्या रविवार, दि. ०८ जानेवारी, २०२३ रोजी होणाऱ्या निवडणुकीची **मतमोजणी मंगळवार, दि. १० जानेवारी, २०२३ रोजी, सकाळी ८.०० वा. पासून विद्यापीठाच्या पै.खाशाबा जाधव क्रीडा संकुल येथील इनडोअर हॉलमध्ये** सुरू होणार आहे व मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/१०
दिनांक :०६/०१/२०२३

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

**प्रत : सर्व संबंधित.**

D:\Election 2022 (Bhosale)\Teacher\Prakatan.docx